# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट ०४/२०२५ दि. ०२/०१/२०२५

## रिक्षा व मोटर सायकलची चोरी करुन घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीतास अटक करुन असा २,२५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २२/१२/२०२४ रोजी रात्रौ ०८.०० वा. ते दि.२३/१२/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वा.चे दरम्यान गवराई नाका, संतोष भवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर येथे यातील फिर्यादी यांनी त्यांची होन्डा कंपनीची काळ्या रंगाची शाईन मोटर सायकल क्र.एम एच ४८ ए जे ७२६४ ही पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय फिर्यादी यांची मोटरसायकल चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९८६/२०२४ भा. न्या. सं. कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ भेट देऊन घटनास्थळ परिसर ते मिरा रोड असे एकुण ६० ते ७० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे इसम नामे साबिरअली मुर्तुझाअली शेख ऊर्फ फत्ते, वय २८ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यास सदर गुन्हयात चोरी केलेल्या ०२ रिक्षा, ०१ मोटर सायकलसह ताब्यात घेऊन त्याची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात सॅमसंग कंपनीचा व रेडमी कंपनीचा असे ०२ मोबाईल फोन मिळुन आले.

सदर इसमास विश्वासात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याचेकडून २,२५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर इसमाकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**सदर इसमाकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.**

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९८६/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०३ (२) प्रमाणे.(मुळ गुन्हा) |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९९०/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे. |
| ३ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९९६/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे. |
| ४ | एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी मुंबई | गु.र.क्र. ८५३/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०५(बी), ३३१(४) प्रमाणे. |

सदर इसमाचे ताब्यात मिळुन आलेल्या मोबाईल बाबत माहिती घेतली असता त्याने व त्याचे साथीदाराने मिळून सदर मोबाईल फोन अंधेरी येथील कॅफे शॉप मधुन चोरी केले असल्याबाबत निष्पन्न झाले आहे. सदर इसम हा सराईत असुन त्याच्या विरोधात वेगवेगळया पोलीस ठाण्यात खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी मुंबई | गु.र.क्र. ४३८/२०१४ भादविस कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे |
| २ | एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी मुंबई | गु.र.क्र.४५६/२०१४ भादविस कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ३ | एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी मुंबई | गु.र.क्र. १३६५/२०१९ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी मुंबई | गु.र.क्र. ९०७/२०२४ भा.न्या.संहिता कलम ३०५,३३१(३),३३१(४)प्रमाणे. |
| ५ | निर्मल नगर पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ३०६/२०१६ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| ६ | निर्मल नगर पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ३२४/२०१६ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| ७ | वाकोला पोलीस ठाणे, मुंबई. | गु.र.क्र. ४६५/२०१८ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| ८ | वाकोला पोलीस ठाणे, मुंबई. | गु.र.क्र. ४७४/२०१८ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |

सदर इसमास अटक करणेत आली असुन त्याने वसई, अंधेरी, मुंबई परिसरात चोऱ्या केल्या असल्याबाबत सांगितले आहे. तरी आपल्या पोलीस ठाण्यात आरोपीत त्याचे विरोधात गुन्हे नोंद असल्यास सदर आरोपीत याचा मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ४ थे न्यायालय वसई येथुन ताबा घेण्यात यावा.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्रीमती. दुर्गा चौधरी पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/रमेश वाघचौरे, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, वसिम शेख यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.







--------------------------------------